# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**परिपत्रक क्रमांक : ४९४/ मराठी भाषा समिती (ड-१७)**

**विधान भवन, मुंबई.**

**दिनांक : १० जानेवारी, २०२२.**

**संदर्भ :** मराठी भाषा विभाग शासन परिपत्रक क्र. मभापं-२०२१/प्र.क्र.१३६/भाषा -२, दि. २२ डिसेंबर, २०२१.

## :: प रि प त्र क ::

मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी व तिचे संवर्धन करण्यासाठी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय विद्यमाने "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी, २०२२ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने साजरा करण्यात येणार असून, त्याचे प्रक्षेपण https://www.youtube.com/c/MAHARASHTRALEGISLATURESECRETARIAT/Playlists युटयुब चॅनेल वर करण्यात येईल.

**:: कार्यक्रम ::**

**(१) शुक्रवार, दिनांक १४ जानेवारी २०२२– ऑनलाईन उदघाटन -**

मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या शुभहस्ते व मा.समिती प्रमुख, मराठी भाषा समिती आणि प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांच्या उपस्थितीमध्ये विधान भवन, मुंबई इमारतीमधील १ ला मजला, कामकाज सल्लागार समिती दालन क्रमांक १४५ येथे कार्यक्रमाचे उदघाटन संपन्न होणार असून उदघाटनामध्ये दोन्ही सदनाचे मा.विरोधी पक्षनेते आणि मा.उप पीठासीन अधिकारी यांचे संदेश व शुभेच्छा प्रसारित करण्यात येतील.

**(२) सोमवार,दिनांक १७ जानेवारी २०२२- "महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ ते विधिमंडळाची मराठी भाषा समिती स्थापनेसंदर्भातील प्रवास" या विषयावरील माहिती –**

मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन आणि या सचिवालयातील ग्रंथालय कक्षाकडून प्रसारित करण्यात येईल.

**(३) मंगळवार,दिनांक १८ जानेवारी २०२२- "मराठी भाषा समितीची स्थापना, अहवाल, शासनास केलेल्या शिफारशी तसेच समितीचे मराठी भाषा जतन, प्रसार व संवर्धनासाठीचे योगदान"**

**वक्ते** - मा.समिती प्रमुख, मराठी भाषा समिती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**(४) बुधवार, दि. १९ जानेवारी २०२२– विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या सन्मा.सदस्यांनी मराठी भाषेच्या जतन, प्रसार व संवर्धनासाठी केलेले प्रयत्न व योगदान..**

- वक्ते -

- **श्री. दिवाकर रावते, वि.प.स. तथा समिती सदस्य, मराठी भाषा समिती.**
- **श्री.उल्हास पवार, माजी वि.प.स.**
- **श्री.एकनाथराव खडसे, माजी वि.स.स.तथा माजी मंत्री**

**(५) गुरुवार, दिनांक २० जानेवारी, २०२२– मराठी भाषेच्या जतन, प्रसार व संवर्धनासाठी स्वयंसेवी संस्थांचे योगदान**

**वक्ते- श्री.हेमंत टकले, माजी वि.प.स.**

**(६) शुक्रवार, दिनांक २१ जानेवारी, २०२२–मराठी भाषा आणि प्रसिध्दी माध्यमे,**

**वक्ते**

- **श्री.मंदार पारकर, अध्यक्ष, मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघ कार्यकारिणी.**
- **श्री. दिलीप चावरे, जेष्ठ पत्रकार**

(मान्यवरांच्या उपलब्धतेनुसार कार्यक्रमाचे दृक-श्राव्य संदेश (क्लीप)प्रसारित करण्यात येतील)

**(७) सोमवार, दिनांक २४ जानेवारी व मंगळवार, दिनांक २५ जानेवारी,२०२२ - कथाकथन/काव्यवाचन इत्यादी--**

या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी कथाकथन/काव्यवाचन यामध्ये सहभागी व्हावयाचे असून इच्छुकांनी आपली नावे, संबंधित माहितीसह श्री. निलेश मदाने, जनसंपर्क अधिकारी तथा संचालक, वि.स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र यांच्याकडे दिनांक १२ जानेवारी २०२२ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत नोंदवावीत.

**(८) गुरुवार, दिनांक २७ जानेवारी २०२२–मराठी भाषेचा प्रसार, प्रसार आणि संवर्धन या उद्देशासह रोजगाराभिमुख उपक्रम या विषयावरील चर्चा – प्रमुख सहभाग – मा.प्रधान सचिव, डॉ. अनिल महाजन, सहसचिव (समिती) तथा विशेष कार्य अधिकारी, श्री.सोमनाथ सानप, अवर सचिव, श्री.निलेश मदाने, संचालक, वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र.**

**(९) मराठी अभिमान गीत –**

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा (दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी,२०२२) कालावधीत विधान भवन, मुंबई इमारतीमध्ये कविवर्य सुरेश भट लिखित व कौशल इनामदार यांनी संगीतबध्द केलेले "लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी... या मराठी अभिमान गीताची थोडक्यात माहिती व गीताची ध्वनीफित सकाळी ११.०० वाजता, दु.२.३० वाजता, सायंकाळी ४.३० व ६.०० वाजता याप्रमाणे ऐकविण्यात येईल.

(१०) मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन व राज्य मराठी विकास संस्थेकडून **"मराठीतील संत वाङमयीन परंपरा, मराठीतील विविध बोली भाषेसंदर्भातील माहिती आणि मराठी भाषेच्या लिपीचा प्रवास"**या विषयावरील फलक(बॅनर) विधान भवन,मुंबई इमारतीच्या मुख्य प्रवेशाद्वाराजवळ लावण्यात येणार आहेत.

यू-ट्यूबवर प्रक्षेपित करावयाच्या भागांच्या चित्रीकरणाची व्यवस्था दिनांक १२,१३,१४ जानेवारी,२०२२ या तीन दिवशी सत्ताधारी पक्ष दालन, १० मजला, विधान भवन, मुंबई येथे (तात्पुरता स्टुडिओ) येथे करण्यात आलेली आहे.

**( अनिल महाजन )**

**सह सचिव (समिती) तथा विशेष कार्य अधिकारी,**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

**प्रति:**

१.मा. समिती प्रमुख, मराठी भाषा समिती, महाराष्ट्र विधिमंडळ.

२.महाराष्ट्र विधानसभेचे/विधानपरिषदेचे सर्व सन्मा.सदस्य.

३ मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव

४. मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी

५. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद/ महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव

६. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

७. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी

८. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.

९. विधिमंडळाची सर्व पक्ष कार्यालये.

१०. संगणक कक्ष (Website)

११. निवड नस्ती.